पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**
सोलापूर - पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune Natioinal Highway, Kegaon, Solapur - 413 255 (Maharashtra)
ईपीएबीक्स - ०२१७ २७४४७७० ते २७४४७७२ फॅक्स: २३५१३००
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in



जा.क्र.पुअहोसोविसो/सनिवि/4844 दि. 28 JUN 2022

# निवडणूक संदर्भातील सविस्तर जाहीर विज्ञापन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य परिसंस्थांचे संचालक, संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांचे व्यवस्थापन प्रतिनिधी, शिक्षक, विद्यापीठ परिसरातील शिक्षक व नोंदणीकृत पदवीधर इत्यादींना याद्वारे सूचित करण्यात येते की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांची (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २६ मध्ये नमूद केलेले) निवडणूक प्रक्रिया सुरु होत असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ६२ नुसार नवीन प्राधिकरणांची मुदत दि.०१ सप्टेंबर, २०२२ पासून पुढील पाच वर्षाकरिता असणार आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २६ मध्ये नमूद केलेल्या सर्व प्राधिकरणांच्या निवडणूकीसंदर्भात नावनोंदणी सूचना, तद्अनुषंगिक इतर माहिती, निवडणूक प्रकटन पात्र / अपात्र मतदार यादी इ. विषयांची संपूर्ण माहिती वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. याकरिता विविध प्राधिकरणांच्या निवडणूकीसाठी इच्छूक असलेल्या सर्व घटकांनी वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Election-२०२२ या पोर्टलवर प्रसिध्द होणाऱ्या सूचनांची माहिती घ्यावी.

तरी निवडणूक सूचना व अधिसूचना या संदर्भातील कोणताही पत्र व्यवहार विद्यापीठाकडून केला जाणार नाही. याकरिता वेळोवेळी विद्यापीठाचे संकेतस्थळ बघण्याची जबाबदारी संबंधितांची असेल. तसेच याबाबत काही शंका / अडचणी असल्यास त्या विद्यापीठाच्या निवडणूक विभागास election2022@sus.ac.in या ईमेलवर पाठवाव्यात.

सर्व संबंधितांनी उपरोक्त बाबींची नोंद घेवून विद्यापीठास कृपया सहकार्य करावे.

प्र. कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी